सायं.दैनिक आवाज जनसामान्यांचा..
# बीड किसान
• संपादक : शेख कामरान •




बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ४९ ▪ बुधवार, दि. २५ जून, २०२५ ▪ पोस्टल दिनांक २६ जून, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-49 ▪ Wednesday 25 June, 2025 ▪ Postal Date 26 June, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# विधानसभेच्या निवडणुकीनंतर घरीच एसीत बसणाऱ्या नेत्यांना संदीप भैय्यांचा आमदार आपल्यादारी उपक्रम येणाऱ्या स्थानिकच्या निवडणुकीत घाम फोडणार!

## काही नेते विधानसभेच्या निवडणुकीत पडल्यापासून जनतेत गेलेच नाही तर दुसरीकडे आ.संदीप क्षीरसागरांच्या आमदार आपल्या दारी संकल्पनेतून सामान्य मतदारांशी संवाद



**बीड । किसान न्युज**

**येथील आ.संदीप भैय्या क्षीरसागर म्हणजे लोकांमध्ये रमणारा आमदार म्हणून ओळख निर्माण केली. तर त्यांनी आता लोकांच्या समस्यांची माहिती व्हावी यासाठी आमदार आपल्या दारी संकल्पना घेऊन सामान्य जनतेशी संवाद साधत आहेत. काल मंगळवारी (दि.२४) त्यांनी चौसाळा जि.प. गटात आमजनतेशी संवाद साधला तर आज सकाळी लिंबागणेश सर्कल दौरा येथे शहरासह ग्रामीण भागातील नागरीकांशी संवाद साधला. यावेळी लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून दोन्ही ठिकाणी मोठी गर्दी दिसून आली.**

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार आ. संदीप क्षीरसागर विजयी झाल्यापासून कामाला लागले आहे. ज्या विश्वासाने मतदारांनी त्यांना विजयी केले तो विश्वास ते खरा ठरवित आहेत. ते आमदार म्हणून नव्हे तर मतदारसंघाचा सेवेकरी या भावनेतून काम करीत आहेत. त्यांचे नाली, स्वच्छता, वीज, रस्ते यासह आदी प्रश्नांवर त्यांचे बारीक लक्ष आहे. उन्हाळ्यात शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. यावेळी त्यांनी स्वतः उन्हाची तमा न बाळगता माजी. आ.सय्यद सलीम यांना सोबत घेऊन उन्हात थांबून काम वेळेत करुन घेतले. तसेच ते बीडमध्ये असले की, विविध भागात भेटी देऊन आमजनतेशी संवाद साधत अडचणी जाणून घेत ते सोडविण्याचे काम करीत आहेत. तर शहरातील स्वच्छता ही त्यांनी करुन घेतली असून बिंदुसरा नदीतील हजारो टन कचरा उचलून नदी स्वच्छ केली. यानंतर बऱ्याच दिवसांपासून मागणी असलेला बार्शी नाका पुलाजवळील पूलकम बंधाऱ्याचा प्रश्न मार्गी लावला असून त्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. तसेच शहर व ग्रामीण भागाची विजेची मागणी आणि लपंडाव पाहून नवीन २२० के.व्ही. विद्युत लाईनचे काम सुरू केले. हे सर्व कामे पहाता संदीप भैय्या यांच्यातील दूरदृष्टी दिसून येत आहे. जोपर्यंत आपण लोकांत जाणार नाही तोपर्यंत त्यांचे प्रश्न आपल्याला समजणार नाहीत. हे ओळखून ते जास्तीत जास्त वेळ लोकांमध्ये मिसळून संवाद साधत आहेत. यामुळे त्यांना जनतेत रमणारा » पान २ वर

# हायवाला पाठीमागून धडकून अपघात; दुचाकीस्वार ठार

## बीड परळी महामार्गावरील सिरसाळा जवळील घटना

**परळी । किसान न्युज**



बीड-परळी महामार्गावर सिरसाळा जवळ आज बुधवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघातात दुचाकीस्वार प्राध्यापक अमोल बालासाहेब लव्हाळे (रा. सुकळी) यांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. परळी-सिरसाळा रस्त्याचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे. मात्र, बीडकडून सिरसाळ्याकडे जाताना जैन पेट्रोल पंपाजवळ रस्त्याचे काम अर्धवट राहिल्याने या ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याचे समोर आले आहे. आज सकाळी याच धोकादायक ठिकाणी बीडकडून सिरसाळ्याकडे जाणाऱ्या भारत बेंज कंपनीच्या एका हायवाने अचानक ब्रेक दाबले. त्यामुळे पाठीमागून येणारी दुचाकी एम.एच. ४४ आर ९०८१ याची हायवाला जोरदार धडक बसली आणि हा भीषण अपघात घडला, अपघातानंतर अमोल लव्हाळे हे जागीच कोसळले आणि गंभीरित्या जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांना उपचारांसाठी प्रथम सिरसाळा येथील खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारांसाठी परळी येथील रुग्णालयात पाठवण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

# जातीय द्वेषातून उधळलेल्या सोमय्यांना उपमुख्यमंत्री पवारांनी घातली वेसण

## अनाधिकृत भोंग्यावर कारवाई करा पण चुकीचा मार्ग वापरु नका

**मुंबई । किसान न्युज**

मशिदींवरील अनधिकृत भोंग्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मुंबईसह राज्यातील मशिदीवरील भोंग्यांविरोधात कारवाईची मागणी करण्यात येत आहे. तर वारीस पठाण हे पण या वादात उतरले आहेत. दरम्यान मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली अनधिकृत भोंग्याच्या संदर्भात बैठक संपली. त्यावेळी दादांनी भाजप नेते किरीट सोमय्यांना स्पष्ट शब्दात समज दिली. यामुळे जातीय द्वेषातून



उधळलेल्या सोमय्यांना अजित पवार यांनी वेसण घातल्याची चर्चा राज्यात सुरु झाली आहे. अजित पवारांनी किरीट सोमय्यांना मशिदीत जाऊ नये असं स्पष्ट शब्दात सांगितलं. त्यांच्या » पान २ वर

### राजकारण न करता शंभर टक्के भोंगे बंद व्हायला हवी

**भोंग्यांच्या आडून भाजपा राजकारण करीत असून, त्यांना खरंच भोंगे बंद करायचे आहे की, राजकारण हे समजत नसून भोंग्यांचा प्रश्न विनाकारण मुस्लिमांशी जोडून ते राजकारण करीत आहेत. किरीट सोमय्या सारखे नेते त्यात तेल टाकीत आहेत. यामुळे हा कोणत्याही एका जातीचा अथवा धर्माचा हा प्रश्न नसून यातून आधी भाजपाने बाहेर पडावं आणि राज्यातील शंभर टक्के भोंगे बंद करावेत. जेंव्हा शंभर टक्के भोंगे बंद होतील तेंव्हाच हा प्रश्न निकाली निघणार आहे. पण हा प्रश्न निकाली न काढता चर्चेत ठेवून सत्ताधारी ओटबँकचे राजकारण करीत आहे. अशी चर्चा सुरू असून, शासनाने शंभर टक्के भोंगे बंद करावेत अशी मागणी करण्यात येत आहे.**

# प्राथमिक आश्रमशाळा वडझरी शाळेच्या शिक्षकांचे विविध मागण्यासाठी आंदोलन

**बीड । किसान न्युज**

पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील मातोश्री सेवाभावी संस्था वडझरी संचलित, प्राथमिक आश्रमशाळा येथील शिक्षक व कर्मचाऱ्यांवरचे मागील १३ महिन्यांचे वेतन थकीत आहे. हे वेतन तात्काळ द्यावे यासह विविध मागण्यासाठी शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषणाला बसले आहेत. या शाळेच्या शिक्षक व कर्मचारी यांचे माहे जून » पान २ वर




# चकलांबा पोलिसांनी वाळूचा हायवा पकडला

**चकलांबा । किसान न्युज**

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवायाच्या दिलेल्या सुचनेनुसार चकलांबा पोलिसांच्या वतीने कारवाईची मोहीम राबविण्यात येतं आहे. उमापूर-माटेगाव रस्त्यावर वाळू वाहतूक करणारा एक हायवा सपोनि संदीप पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी रस्त्यावर वाहने आडवी लावून ताब्यात घेतला आहे. यावेळी एका आरोपीला पकडण्यात आले असून या कारवाईत २५ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मंगळवारी रात्री गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली की एक हायवा



वाळू भरून उमापूर ते माटेगाव असा जात आहे , तरी सपोनि पाटील स्वतः स्टाफ सह लागलीच मालेगाव येथे सापळा रचून बसले होते. यावेळी भरधाव वेगात हायवा येतं » पान २ वर

# संघटनेच्या आडून पोटोद्यात महावितरण कर्मचाऱ्यांची दादागिरी

## जखमी गुत्तेदारावर गुन्हा दाखल पाटोदा पोलिसांचा प्रताप

**पाटोदा । किसान न्यूज**

येथील गुत्तेदार आणि लाईनमन मारहाण प्रकरणाला वेगळे वळण लागले असून, संबंधित गुत्तेदाराने मलाच पाईपने मारहाण



केली असून तीन टाके पडले आहेत. यामुळे महावितरणच्या कर्मचाऱ्यांवरच गुन्हा दाखल करण्याची मागणी गुत्तेदाराने केली असून, त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. येथील गुलशन इलेक्ट्रिकल या नावाने असलेल्या एका कंपनीला शहरातील विजेच्या तारावर आलेले झाडे झुडपे तोडण्याच्या तीन लाख रुपयांच्या कंत्राट महावितरण कडून नियमानुसार मिळाला आहे. दिनांक २३/६/२०२५ रोजी या कंपनीचे शेख मुजम्मिल शेख सलीम वय ३७ हे आपल्या घरी असताना » पान २ वर

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या भत्त्यात वाढ; महाराष्ट्र शासनाचा निर्णय

**मुंबई । किसान न्युज**

आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे, यासाठी राज्यभरात शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या निर्वाह आणि आहार भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यात ४९० वसतिगृहे सुरू असून, त्यापैकी २८४ मुलांची व २०६ मुलींची वसतिगृहे आहेत. यामध्ये एकूण ५८ हजार ७०० विद्यार्थ्यांची क्षमता आहे. येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (दरमहा) : विभागीय स्तरासाठी ८०० वरून १४०० रुपये, जिल्हा स्तरासाठी ६०० रु. वरून १३०० रु. आणि ग्रामीण/तालुका स्तरासाठी ५०० रु. वरून १००० रुपये इतका भत्ता देण्यात येणार आहे. मुलींना मिळणारा अतिरिक्त निर्वाह भत्ताही १०० वरून १५० रुपये वाढविण्यात आला आहे. तसेच शैक्षणिक साहित्य खरेदी साठी इयत्ता आठवी ते दहावीसाठी ३२०० रु. वरून ४५०० रुपये, ११ वी, १२ वी व पदविका अभ्यासक्रमासाठी » पान २ वर

**पाहिजेत**

अनुभवी मॅनेजर व रूम बॉय नाईट साठी हॉटेल हिना लॉज जालना रोड बीड

Mob : 9325343615




# भाजपा नेत्याने केला महिला पोलीस अधिकाऱ्याचा विनयभंग

## गर्दीचा फायदा घेऊन लज्जा वाटेल अशा ठिकाणी लावला हात

**पुणे । किसान न्युज**

भाजपचा पुण्यातील शहर महामंत्री प्रमोद कोंढरे याच्यावर एका महिला पोलीस निरीक्षकाने विनयभंग केल्याचा ठपका ठेवला आहे. परिणामी या प्रकरणी प्रमोद कोंढरे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गर्दीचा फायदा घेऊन याने महिला पोलिसाला लज्जा वाटेल अशा ठिकाणी दोनवेळा हात लावला तर यापूर्वीचाही या भाजपा नेत्यावर विनयभंगाचा गुन्हा



दाखल आहे. सोमवारी एका कार्यक्रमाच्या निमित्ताने भाजपचे नेते शनिवार वाड्याजवळ जमले होते. त्यानंतर भाजपचे कसबा पेठचे आमदार हेमंत रासने हे कार्यकर्त्यांना आणि बंदोबबस्तासाठी असलेल्या पोलीसांना एका दुकानात चहा पिण्यासाठी घेऊन गेले. त्यावेळी प्रमोद कोंढरे याने गर्दीचा फायदा घेऊन महिला पोलीस निरिक्षकाला दोन वेळा लज्जा उत्पन्न होईल असा स्पर्श केला. त्यानंतर » पान २ वर

# दारुची अवैध वाहतूक करणारी कार पकडली

**परळी । किसान न्युज**

अवैध दारु घेऊन जाताना परळी ग्रामीण पोलिसांनी कारवाई करून एक स्विफ्ट डीझायर कार सह दारु पकडली. तिघांना ताब्यात घेत ४ लाख २१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई मरळवाडी येथे परळी ग्रामीण पोलिसांनी केली आहे. परळी ग्रामीण पोलीस रात्री गस्तीवर असताना एक कार दिसली त्यावर संशय आल्याने झडती घेतली असता त्यामध्ये देशी-विदेशी दारुची अवैध वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आले. या कारवाईत २१ हजार ५८० रु. दारु साठा तसेच कार ४ लाख असा एकूण ४ लाख २१ हजार ५८० इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर संतोष दगडूबा मस्के,



सय्यद रहेमान सय्यद नोमन, बाळासाहेब योगीराज यादव सर्व रा परळी यांना ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ह. रामचंद्र केकान, पो. ना. गोविंद भताने,पो. कॉ.सचिन आंधळे यांनी केली आहे. » पान २ वर

